### यशोगाथा

# सागर विष्णू हिंदोळे (सोयाबीन बिजोत्पादन कार्यक्रम)



**नाव:** सागर विष्णू हिंदोळे
**पत्ता:** द. वडगाव, करवीर तालुका, कोल्हापूर
**एकूण क्षेत्र:** 06 एकर
**संपर्क:** 9890386829

इंदौर येथे सोया महाकुंभ 29 ते 31 मे 2022 रोजी भरविण्यात आला होता. ह्या कार्यक्रमध्ये ज्या शेतकर्यांनी सोयाबीन मध्ये नाविन्यपूर्ण प्रयोग, चांगले उत्पादन किंवा सोयाबीन क्षेत्र वाढीसाठी योगदान दिले आहे, अशा शेतकर्योंना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये भारतातून 14 शेतकर्यांना सन्मानित करण्यात आले, त्यातील एक शेतकरी म्हणजे श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र कणेरी कोल्हापूर अंतर्गत बिजोत्पादनात सहभागी असलेले कोल्हापूरचे श्री. सागर हिंदोळे.

श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कणेरी यांच्या माफर्फत उन्हाळी हंगामामध्ये सोयाबीन बिजोत्पादनाचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. त्यासाठी कागल व करवीर तालुक्यातील काही गावांची निवड केली होती. त्यातीलच द. वडगावातील शेतकरी सागर विष्णू हिंदोळे हे एक. हिंदोळे यांचे एकूण क्षेत्र 6 एकर एवढे आहे. शेतामध्ये राबणारे त्यांचे आई-वडील, ते स्वत: व पत्नी ते एकात्मिक पद्धतीने शेती करतात. त्यांनी शेती सोबती जोडधंदा म्हणून कुक्कुटपालन व म्हैशी पालनाचा व्यवसाय करतात.

उन्हाळी हंगामामध्ये त्यांनी एक एकर क्षेत्रावरती सोयाबीन घेतले होते. त्यांचे सोयाबीनचे उत्पादन 11.5 क्विंटल मिळाले. ते उत्पादित केलेले सोयाबीन के. व्ही. के. ने 8000 रुपये प्रति क्विंटल दराने घेतले. तेंव्हा त्यांना एका एकरमध्ये 92 हजार रुपये एवढे उत्पादन मिळाले. त्यासाठी त्यांना एकूण खर्च फक्फक्त 18 हजार रुपये आला. निव्वळ नफफ़ा पाहिला तर त्यांना 74 हजार रुपये एवढा नफफ़ा 3 ते 3.5 महिन्यात झाला.



**बिजोत्पादनासाठी घेतलेल्या NRC-130 वाणाची वैशिष्ट्ये**

- कमी दिवसात परिपक्व होणारे (92 दिवसात)
- सेंट्रल झोन साठी शिफारस (मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ, युपी मधील बुंदेलखंड प्रदेश)
- सरासरी उत्पादन 15 qt/ha., उत्पादन क्षमता - 30 qt/ ha.
- झाडाची वाढ 47 cm.
- चारकोल राट रोगासाठी प्रतिकारक्षम
- खोडकिड व चक्रीभुंगा यासाठी प्रतिकारक्षम



श्री सिद्धगिरी कृषि विज्ञान केंद्र, कणेरी, कोल्हापूरला भारतीय सोयाबीन अनुसंधान संस्थान इंदौर अंतर्गत 3S1Y प्रोजेक्ट मिळाला आहे. त्यामध्ये वर्षातील तिन्ही हंगामात सोयाबीन बिजोत्पादन घेतले जाणार आहे. त्याच अनुषंगाने 2022 मधील उन्हाळी हंगामात 85 एकरा वरती हा कार्यक्रम राबविण्यात आला होता. त्यासाठी सोयाबीनचे NRC-130 हे वाण निवडण्यात आले होते व ते कोल्हापूर मधील कागल व करवीर तालुक्यातील वडगाव, व्हन्नूर, कोगील व

वंदूर ह्या गावांमध्ये राबविण्यात आला होता. त्यासाठी पेरणी करण्यापूर्वी सुधारित सोयाबीन लागवड तंत्रज्ञान या विषयी प्रशिक्षण देण्यात आले होते. तसेच वेळोवेळी के.व्ही.के. चे शास्त्रज्ञ शेतकयांचा बांधावर जाऊन शेतकर्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करत होते. हा सोयाबीन बिजोत्पादनाचा कार्यक्रम के.व्ही.के. चे चेअरमन प.पू. अदृश्य काडसिद्धेश्वर स्वामीजी व डॉ. रविंद्र सिंग (वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पांडुरंग काळे (विषय विशेषज्ञ कृषि विद्या) राबवत आहेत.

## सोयाबीन पिकाचे सागर यांनी केलेले नियोजन

- डिसेंबर महिन्याच्या सुरुवातीला त्यांनी जमिनीची पूर्व मशागत करून ३ फुटाची सरी सोडली होती.
- १३ डिसेंबर रोजी त्यांनी सोयाबीनची टोकणी केली.
- पेरणी करण्यापूर्वी त्यांनी सोयाबीनचे सुधारित लागवड तंत्रज्ञान या विषयावर के.व्ही.के. चे प्रशिक्षण घेतले होते. त्यामुळे पेरणीपूर्वी सोयाबीनला ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम/ किलो, रायझोबियम । पी.एस.बी. २५ ग्रॅम/किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया केली.
- सरीच्या दोन्ही बाजूंनी टोकणी केली.
- दोन टोच्यातील अंतर ९ - १२ इंच एवढे ठेवले व एका टोच्यामध्ये ३ ते ४ बियाण्यांचा वापर केला.
- पिक वाढीच्या अवस्थेत १९:१९:१९ या विद्राव्य खताची ३ ग्रॅम / १ लिटर पाणी याप्रमाणे सोयाबीन वरती फक्रवारणी केली त्यामुळे पिकाची जोमदार वाढ होण्यास मदत झाली.
- पीक फक्रुलोरा अवस्थेत असताना ००:५२:३४ या विद्राव्य खताची ५ ग्रॅम/ १ लिटर पाणी याप्रमाणे सोयाबीन वरती फक्रवारणी केली.
- ह्र्शेंगा भरण्याच्या अवस्थेत ००:००:५० च्या विद्राव्य खताची फक्रवारणी केल्यामुळे शेंगा भरण्यास मदत झाली. या सर्व गोष्टीमुळे त्यांना कमी दिवसात चांगले उत्पादन काढता आले.






